# किटकशास्त्र विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

**त्वरित प्रसारणासाठी**
पीक संरक्षण पत्रिका क. १०

जा.क.विप्रकि/ पिसंयो /३६४/२०२६
दि.०४/०९/२०२६

## सोयाबीनवरील पाने खाणाऱ्या अळीचे एकात्मिक व्यवस्थापन

सध्यस्थितीत सोयाबीन पिकावर काही ठिकाणी तंबाखुची पाने खाणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव दिसुन येत आहे. अकोला, मुर्तीजापूर, अकोट व तेल्हारा तालुक्यातील काही ठिकाणी सोयाबीन पिकावर तंबाखुची पाने खाणाऱ्या अळीचा ( स्पोडोप्टेरा लिटुरा) प्रादुर्भाव आर्थिक नुकसान पातळीच्यावर आढळून आला आहे.






या किडीला शास्त्रीय भाषेत स्पोडोप्टेरा लिटुरा या नावाने ओळखतात. किडीचा पतंग मजबूत बांध्याचा २२ मिमी लांब असून पुढील पंख सोनेरी व करडया तांबडया रंगाची असतात. या किडीचा मादी पंतग पानाच्या खालच्या बाजुने पुंजक्यात अंडी घालतो. एका अंडी पुंजक्यामधे ८० ते १०० अंडी असतात. एक मादी सरासरी ३०० ते ४०० अंडी घालते. अंडी अवस्था हि तीन ते चार दिवस तर अळी अवस्था २१ ते २२ दिवसाची असते. पुर्ण वाढ झालेली अळी जाते. कोष जमिनीमधे ३ ते १० से.मी. खोलवर असतात. कोषावस्था ९ ते १० दिवस असते. प्रौढ अवस्था जवळजवळ ६ ते ७ दिवसांची असते. मादी प्रौढ कोषातून बाहेर येताच पानाच्या खालच्या बाजुला अंडी घालण्यास सुरुवात करते. तसेच एक पिढी पुर्ण होण्यास सर्वसाधारणपणे ३२ ते ४० दिवस लागतात.

**नुकसानीचा प्रकार :**

या किडीने पुंजक्यात घातलेल्या अंडयांमधुन लहान लहान अळया समुहात बाहेर येतात व प्रथमत: त्याच पानातील हरितद्रव्य मागील बाजुने राहून खातात पान जाळीदार होतात. हया अळया नंतर मोठया होऊन स्वतंत्रपणे पाने, फुले, कोवळया शेंगा पोखरुण खातात. हि बहुभक्षीय किड असल्यामुळे अनेक पिकावर आढळून येते.



जमिनीत कोषावस्थेत जाते

**व्यवस्थापन उपाययोजना**



प्रादुर्भावग्रस्त शेत

१. बांधावरील तणाचा नायनाट करावा.
२. पक्षांना बसण्यासाठी शेतात हेक्टरी १५ ते २० पक्षी थांबे लावावेत म्हणजे त्यावर बसणारे पक्षी शेतातील अळया टिपून खातील.
३. तंबाखुची पाने खाणारी अळी एकाच पानावर पुंजक्याने अंडी घालातात त्यामुळे अशी अंडी व अळीग्रस्त पाने तोडून किडीसह नष्ट करावीत.
४. तंबाखुची पाने खाणारी अळी या किडीच्या प्रादुर्भावाची पातळी समजण्यासाठी सर्वेक्षणाकरीता प्रत्येक किडींसाठी हेक्टरी १० कामगंध सापळे शेतात लावावेत.
५. सापळयामध्ये प्रति दिन ८ ते १० पतंग २ ते ३ दिवस आढळल्यास किडींच्या नियंत्रणासाठी उपायोजना करावी आणि सापळयात जमा झालेले पतंग रॉकेलमिश्रित पाण्यात टाकून नष्ट करावेत.

**रासायनिक किटकनाशकांचा वापर :** आर्थीक नुकसानीची पातळी (४ अळया/मी. ओळ) ओलांडल्या नंतर या किडींचे व्यवस्थापनासाठी खाली दिलेल्या कोणतेही एक किटकनाशकाची प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी.

| अ.क्र. | व्यवस्थापनाकरीता रासायनिक किटकनाशके मात्रा प्रति १० लिटर पाणी | सोयाबीन किडींची नावे |
|---|---|---|
| १. | क्लोरॅन्ट्रॅनिलीप्रोल १८.५ टक्के ३.० मि.ली | तंबाखूची पाने खाणारी अळी, हिरवी उंट अळी, *केसाळ अळी |
| २. | फ्लुबेंडामाईड २० टक्के डब्ल्युजी ५ ग्रॅम | तंबाखूची पाने खाणारी अळी, हिरवी उंट अळी, |
| ३. | फ्लुबेंडामाईड ३९.३५ टक्के एससी ३ मिली | तंबाखूची पाने खाणारी अळी, हिरवी उंट अळी, शेंगा पोखरणारी अळी, *केसाळ अळी |
| ४. | इंडोक्झाकार्ब १५.८ टक्के प्रवाही ६.७ मि. ली. | तंबाखूची पाने खाणारी अळी, खोडमाशी, शेंगा पोखरणारी अळी, *केसाळ अळी |
| ५. | इमामेक्टीन बेंझोएट १.९० टक्के प्रवाही ८.५ मिली | तंबाखूची पाने खाणारी अळी, हिरवी उंट अळी, *केसाळ अळी, शेंगे अळी, चक्रिभुंगा |
| ६. | थायोमेथोक्झाम १२.६ टक्के + लॅम्ब्डासायहॅलोथ्रीन ९.५ टक्के झेडसी २.५ मिली | तंबाखूची पाने खाणारी अळी,हिरवी उंट अळी, *केसाळ अळी, शेंगे अळी, चक्रिभुंगा |
| ७. | क्लोरॅन्ट्रॅनीलीप्रोल ९.३० + लॅम्ब्डासायहॅलोथ्रीन ४.६ टक्के झेडसी ४ मिली | तंबाखूची पाने खाणारी अळी, हिरवी उंट अळी, *केसाळ अळी, शेंगे अळी, चक्रिभुंगा |

टिप : वरील किटकनाशकाची मात्रा ही साध्या नॅपसॅप स्पेअरसाठी शिफारशीत असुन पावर स्प्रेने फवारणी करावयाची असल्यास वरील किटकनाशकांची मात्रा तिप्पट करावी.

(डी.बी. उंदिरवाडे)
**विभाग प्रमुख**, किटकशास्त्र विभाग
डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

**प्रतिलीपी - सर्व स्तरावरुन प्रचार व प्रसारा करीता** मा. आयुक्त(कृषि), मा.संचालक ( विस्तार) कृषि आयुक्तालय, मा. संचालक (संशोधन), डॉ. पंदेकृवि, मा. संचालक (विस्तार शिक्षण), डॉ. पंदेकृवि, सहसंचालक (कृषि), अमरावती, नागपूर विभाग, सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व उपविभागीय कृषि अधिकारी, कुलगुरू यांचे तांत्रिक सचिव यांना मा. कुलगुरु, डॉ. पंदेकृवि, सर्व कृषि विज्ञान केंद्र. विद्यापीठाचे माहिती अधिकारी, सर्व वर्तमानपत्रे.